# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी – ३०२३३४७६, २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स - २२६९०००७.

E-mail : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१७/शा१६०८

दिनांक : 29 JUN 2017

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

**विषय : पद्म पुरस्कार सन २०१८ साठी शिफारशी.**

उपरोक्त विषयाबाबतचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्रमांक संकीर्ण-१११९/सं.क्र.४३/१७/समन्वय, दिनांक १२.६.२०१७ चे पत्र सहपत्रांसह सोबत जोडत आहे.

प्रजासत्ताक दिन दिनांक २६.१.२०१८ रोजी घोषित होणा-या पद्म पुरस्काराकरीता (पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण) केंद्र शासनाकडे शिफारशी पाठवावयाच्या आहेत. पद्म पुरस्कार हा सर्वोच्च नागरी पुरस्कारापैकी एक असून ते अतिशय प्रतिष्ठेचे असतात. हे पुरस्कार विविध क्षेत्रातील उल्लेखनीय सेवेबद्दल दिले जातात. या क्षेत्रांची स्पष्टीकरणात्मक यादी सोबत जोडली आहे. तरी, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १८ मे, २०१७ च्या परिपत्रकात दिलेले निकष व सूचनेच्या आधारे शिफारस योग्य असतील असे आपल्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यामधील प्रस्ताव पुढील १५ दिवसांमध्ये या संचालनालयास पाठवावेत जेणेकरून ते दिनांक ३०.७.२०१८ पर्यंत शासनास पाठविणे शक्य होईल.

सहसंचालक, तंत्रशिक्षण,
वि.का.
आवक : 5953

( सुचित्रा रणदिवे )
सहाय्यक संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

पृ.पत्र क्र.विकाऔ/आस्था-१/२०१७/2508
दिनांकः- 10 JUL 2017

प्रति,
**प्राचार्य**,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद.
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद.
**प्राचार्य**,शासकीय तंत्रनिकेतन,
औरंगाबाद/जालना/अंबड/जिंतूर/हिंगोली/नांदेड/बीड/उस्मानाबाद/पु.ला.शा.तं.लातूर/शा.नि.म.तं.लि.लातूर
**उपसचिव**,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद.

यांना कळविण्यात येते की,उपरोक्त तंत्रशिक्षण,संचालनालय,महा.राज्य,मुंबई यांच्या पत्रातील निर्देशानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१८/०५/२०१७ च्या परिपत्रकात दिलेले निकष व सुचनेच्या आधारे शिफारस योग्य असतील असे आपल्या संस्थेतील पद्म पुरस्कार सन-२०१८ साठीचे प्रस्ताव दि.१४/०७/२०१७ पर्यंत या कार्यालयास पाठविण्यात यावेत.

**सोबतः-वरीलप्रमाणे**

**प्रत**:-या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्यास्तव.

**सहसंचालक**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय**
**औरंगाबाद.**

Indorsment

महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-११११/सं.क्र.४३ /१७/समन्वय
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :- १२ जून, २०१७.

प्रति,

१) सर्व सह सचिव /उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) संचालक, (~~उच्च शिक्षण~~/ तंत्र शिक्षण / ~~कला~~ / ~~ग्रंथालय~~ ) महाराष्ट्र राज्य, ~~पुणे~~/मुंबई.

विषय :- पद्म पुरस्कार सन २०१८ साठी शिफारशी.

महोदय,

उपरोक्त विषयावरील सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.पद्म-२०१७/प्र.क्र.५५/३१ दि.१८ मे, २०१७ ची प्रत सहपत्रासह सोबत जोडली आहे.

२. प्रजासत्ताक दिन दि.२६.१.२०१८ रोजी घोषित होणा-या पद्म पुरस्काराकरीता (पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण) केंद्र शासनाकडे शिफारशी पाठवावयाच्या आहेत. पद्म पुरस्कार हा सर्वोच्च नागरी पुरस्कारापैकी एक असून ते अतिशय प्रतिष्ठेचे असतात. हे पुरस्कार विविध क्षेत्रामधील उल्लेखनीय सेवेबद्दल दिले जातात. या क्षेत्रांची स्पष्टीकरणात्मक यादी सोबत जोडली आहे. वरील दि.१८.५.२०१७ च्या परिपत्रकात दिलेले निकष व सूचनेच्या आधारे शिफारस योग्य असतील असे प्रस्ताव दि.३०.७.२०१८ पर्यंत सामान्य प्रशासन विभागास पाठविण्याबाबत कळविण्यात आले आहे. तरी सदर परिपत्रकात सूचित केल्यानुसार योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात यावी, अशी विनंती आहे.

आपला विश्वासू,

( रा.वि.जाधव )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र :- वरीलप्रमाणे

९०५

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक -पद्म १०१७/प्र क्र ५५/३१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १८ मे, २०१७.

परिपत्रक

प्रजासत्ताक दिन दिनांक २६ जानेवारी, २०१८ रोजी घोषित होणाऱ्या पद्म पुरस्काराकरीता (पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण) शिफारशी केंद्र शासनाकडे पाठवावयाच्या आहेत. पद्म पुरस्कार हे सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी एक असून ते अतिशय प्रतिष्ठेचे असतात. हे पुरस्कार विविध क्षेत्रांमधील उल्लेखनीय सेवेबद्दल दिले जातात. या क्षेत्रांची स्पष्टीकरणात्मक यादी सोबत जोडली आहे.

२. पद्म पुरस्कारांकरिता शिफारशी करतांना केंद्र शासनाने पुढीलप्रमाणे निकष सुचविले आहेत:-

अ) शिफारस करताना संबंधित क्षेत्रातील अत्युकृष्ट कार्य (Excellence Plus) हा निकष असावा. या उल्लेखनीय कार्यामध्ये समाजसेवा हाही एक घटक असावा.

ब) पुरस्कारासाठी नावे सुचवतांना समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, महिला, अपंग व कमकुवत घटकांमधील व्यक्तींचाही विचार व्हावा.

क) पद्म पुरस्कार हा देशातील दुस-या क्रमांकाचा पुरस्कार असून या पुरस्कारासाठी शिफारस प्राप्त व्यक्तीस त्याच्या क्षेत्रातील राष्ट्रीय किंवा किमान राज्य पुरस्कार मिळाला आहे किंवा कसे याचाही विचार करावा.

ड) राज्य शासनाच्या तसेच सार्वजनिक उपक्रम सेवेत असलेले फक्त डॉक्टर व वैज्ञानिक पद्म पुरस्कारासाठी अर्ज करू शकतील.

इ) मरणोत्तर पुरस्काराची शक्यतो शिफारस करु नये. अपवादात्मक प्रकरणामध्ये जानेवारी, २०१७ नंतर निधन झालेल्या व्यक्तींची शिफारस करता येईल. त्यापूर्वी निधन झालेल्या व्यक्तींची पद्म पुरस्कारासाठी शिफारस करु नये.

ई) पद्मभूषण पुरस्कारासाठी मान्यवरांची शिफारस पद्मश्री पुरस्कार प्राप्त केल्यानंतर ५ वर्षानी करता येईल. तसेच, पद्मविभूषण पुरस्कारासाठी मान्यवरांची शिफारस पद्मभूषण प्राप्त केल्यानंतर ५ वर्षानी करता येईल. तथापि, हि मर्यादा अपवादात्मक प्रकरणांमध्ये शिथिल करण्यात येईल.

उपरोक्त निकषांच्या आधारे शिफारस योग्य असतील असे प्रस्ताव विभागीय आयुक्त /जिल्हाधिकारी/मंत्रालयीन प्रशासकीय विभागानी या विभागाकडे दिनांक ३० जुलै, २०१७ पर्यंत निश्चितपणे पाठवावेत.

३. पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविताना खालील सूचना विचारात घ्याव्यात.

अ) पात्र व्यक्तींचा शोध घेतांना वृत्तपत्रे किंवा इतर कोणत्याही प्रसिद्धी माध्यमांद्वारे जाहिराती देऊन नावे मागविण्यात येऊ नयेत.

ब) सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी त्यांचे प्रस्ताव संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत पाठवावेत.

क) सर्व विभागीय आयुक्तांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रस्ताव प्राप्त करुन एकत्रित प्रस्ताव शासनास त्यांच्या शिफारशीसह पाठविण्यात यावेत.

ड) सोबत जोडलेल्या विहित नमुन्यामध्ये ३ प्रतीत इंग्रजीमध्ये प्रस्ताव पाठवावेत. तसेच त्यांच्या कार्याची माहिती सायटेशनच्या स्वरुपात इंग्रजीमध्ये पाठवावी. प्रत्येक प्रस्ताव स्वतंत्ररित्या पाठवावा. प्रस्तावासोबत संबंधित व्यक्तीचे छायाचित्र, पुस्तके, वृत्तपत्रीय कात्रणे व इतर साहित्य पाठवू नये.

४. जिल्हाधिकारी कार्यालयांना प्राप्त झालेले प्रस्ताव पद्म पुरस्कारासाठी विहीत केलेल्या निकषाची छाननी न करता जसेच्या तसे शासनास सादर केले जातात असे निदर्शनास आले आहे. यास्तव, ज्या व्यक्तींची शिफारस करावयाची आहे, ती व्यक्ती उपरोक्त परिच्छेद २ मधील निकषांच्या आधारे पद्म पुरस्काराकरीता पात्र आहे किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी यांनी पूर्ण खात्री करुन घ्यावी व आपल्या अभिप्रायासह विहीत प्रपत्र व इंग्रजीमध्ये सायटेशन यासह प्रस्ताव शासनास पाठवावा.

५ प्रकरणी सर्व सबंधितांना सूचित करण्यात येते की, **पद्म पुरस्कारासंदर्भातील प्रस्ताव दि. ३० जुलै, २०१७ पूर्वी या विभागास मिळतील यांची दक्षता घ्यावी. दि. ३० जुलै,२०१७ नंतर प्राप्त होणारे प्रस्ताव /अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०५१८१७२१११७५०७ असा आहे.हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Satish K Jondhale

Digitally signed by Satish K Jondhale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96b5b527d7131539d3b3eb3ba523bb3514dd3d3437a78ac0f73c6d8043215729, cn=Satish K Jondhale
Date: 2017.05.18 17:25:16 +05'30'

( स. का. जोंधळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र:- वरील प्रमाणे

प्रत:-

१) मा. राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३) मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
४) मा. मुख्यसचिव
५) प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य, विभाग मंत्रालय.
६) प्रधान सचिव मराठी भाषा विभाग, मंत्रालय.
७) सर्व विभागीय आयुक्त
८) सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ, विधानभवन, मुंबई (पत्राने)
९) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई.
१०) संचालक, क्रिडा व युवक कल्याण, पुणे
११) सर्व जिल्हाधिकारी,
१२) प्रोथोनोटरी ॲन्ड सिनियर मास्टर, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने)
१३) रजिस्ट्रार, उच्च न्यायालय (अपिलेट साईट), मुंबई (पत्राने)
१४) सर्व मंत्रालयीन विभाग
१५) निवडनस्ती.

# PROFORMA FOR PADMA AWARDS

| | | First Name | Middle Name | Last Name |
|---|---|---|---|---|
| 1 | Shri. | | | |
| 2 | Sex(male / Female) | Male Female<br>M | | |
| 3 | Date of Birth /Age | DD: MM: YY | Age(Yrs) | |
| 4 | State to Which belong: | | | |
| 5 | Nationality:(Indicate NRI/ OCI/ Foreigner) | | | |
| 6 | Complete Postal Address with District,State,Country: | | | |
| 7 | Telephone / Mobile No: | | | |
| 8 | Aadhar No. | | | |
| 8 | Email Address | | | |
| 9 | Religion | | | |
| 10 | Category (SC/ST/OBC/General) | | | |
| 11 | Profession or Occupation: (with designation / office held) | | | |
| 12 | Field of activity* : vis.]Art]Sports] Social work etc. | | | |
| 13 | Padma Award for which name is recommended viz. "Padma Vibhushan", Padma Bhushan",or "Padma Shri" . | | | |
| 14 | Padma Award Conferred if any in the past : | | | |
| 15 | Citation: | | | |

*An illustrative list of fields and details required in the citation is annexed for reference.

Illustrative list of fields

1. Art (includes Music, Painting Sculpture Photography Cinema, and Theatre etc.)

2. Social Work (includes social service, charitable Service, contribution in Community Projects etc.)

3. Public Affairs (includes Law, Public Life, Politics etc.)